आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी – वेळ सायंकाळी 06.40)

सोमवार दिनांक 23 एप्रिल 2018

काही ठळक बातम्या ..........................

1. भारताचे सरन्यायाधीश दीपक मिश्रा यांच्याविरोधात काँग्रेससह सात विरोधी पक्षांनी दाखल केलेला महाभियोग प्रस्ताव उपराष्ट्रपती श्री. एम. वेंकय्या नायडू यांनी फेटाळला.
2. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि राजमार्ग मंत्रालयातर्फे आजपासून येत्या तीस तारखेपर्यंत रस्ता सुरक्षा सप्ताहाचं आयोजन.
3. राज्यातील विविध जिल्ह्यांमधील ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक आणि पोटनिवडणुकींसाठी 27 मे रोजी मतदान घेण्यात येणार.

आणि

4. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना यापुढं दररोज आरोग्य आणि शारीरिक शिक्षणाच्या वर्गांना उपस्थित राहणं अनिवार्य.

***********

भारताचे सरन्यायाधीश दीपक मिश्रा यांच्याविरोधात काँग्रेससह सात विरोधी पक्षांनी दाखल केलेला महाभियोग प्रस्ताव उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे सभापती श्री. एम. वेंकय्या नायडू यांनी फेटाळला आहे. या प्रस्तावात महाभियोगासाठी सबळ कारण नसल्याचं श्री नायडू यांनी म्हटलं आहे. हा प्रस्ताव अयोग्य असल्यामुळं तो फेटाळला गेल्याची प्रतिक्रिया भाजपचे नेते नलिन कोहली यांनी व्यक्त केली, तर हा केवळ न्यायाधीशांना दबावात ठेवण्यासाठीचा काँग्रेसचा प्रयत्न होता, असा आरोप भाजप नेते श्री सुब्रमण्यम स्वामी यांनी केला. याबाबत पुढं कोणतं पाऊल उचलायचं हे आता पक्ष ठरवेल, असं प्रतिपादन ज्येष्ठ वकील आणि काँग्रेस नेते श्री के. टी. एस. तुलसी यांनी केलं आहे. भारताचे माजी अटॉर्नी जनरल सोली सोराबजी यांनी श्री नायडू यांच्या या निर्णयाचं स्वागत केलं आहे. दरम्यान, सरन्यायाधीशांसह सर्वोच्च न्यायालयाच्या इतर सर्व न्यायमूर्तींनी आज पंधरा मिनिटं उशिरानं आजच्या कामकाजाला सुरूवात केली. या पंधरा मिनिटांमध्ये आजच्या घटनाक्रमाबाबत त्यांनी चर्चा केली असावी, असा अंदाज पीटीआयच्या याबाबतच्या वृत्तात वर्तवण्यात आला आहे.

***********

भारत आणि चीन द्विपक्षीय संबंधांवर चर्चा करण्यासाठी आज परराष्ट्र व्यवहार मंत्री श्रीमती सुषमा स्वराज यांनी चीनचे उपराष्ट्रपती श्री वँग किशन यांची भेट घेतली.

श्रीमती स्वराज चार दिवसांसाठी बीजिंगच्या भेटीवर असून, यावेळी शांघाय सहकार्य संस्था यांच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या मंत्री परिषदेत त्या सहभागी होणार आहेत.

***********

पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी येत्या शुक्रवारी चीनच्या भेटीसाठी जाणार असून, तिथल्या वुहान शहरात ते चीनचे राष्ट्रपती श्री शी जिनपिंग यांच्यासोबत अनौपचारिक शिखर बैठक करणार आहेत. परराष्ट्रमंत्री श्रीमती सुषमा स्वराज यांनी काल पेइचिंगमध्ये चीनचे परराष्ट्रमंत्री श्री वांग यी यांच्यासोबतच्या संयुक्त पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. श्रीमती स्वराज या सध्या चीनच्या दौऱ्यावर आहेत. भारतीय आणि चिनी लोकांनी एकमेकांच्या भाषा शिकाव्यात, त्यामुळं संवादातले अडथळे दूर होऊन दोन्ही देशातले संबंध अधिक दृढ होण्यास मदत होईल, असं मत श्रीमती स्वराज यांनी आज बीजिंग इथं एका कार्यक्रमात बोलताना व्यक्त केलं.

***********

रस्त्यांवरच्या सुरक्षेबाबत लोकांमध्ये जागृती आणण्याच्या हेतूनं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि राजमार्ग मंत्रालयानं आजपासून येत्या तीस तारखेपर्यंत एकोणतिसाव्या रस्ता सुरक्षा सप्ताहाचं आयोजन केलं आहे. गृहमंत्री श्री राजनाथ सिंग आणि केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री श्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत आज नवी दिल्लीत एका कार्यक्रमातून या सप्ताहाचं उद्घाटन झालं. महाराष्ट्रातही मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस आणि परिवहनमंत्री श्री दिवाकर रावते यांच्या उपस्थितीत या सुरक्षा सप्ताहाची आजपासून सुरूवात होत आहे. या सप्ताहामध्ये विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून अपघातांची कारणं आणि ते टाळण्याचे उपाय याबाबत माहिती दिली जाणार आहे.

***********

गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड-एटापल्ली तालुक्यात नक्षलवाद्याविरोधात सुरक्षादलांनी केलेल्या कारवाईची मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशंसा केली असून, देश आणि संविधानाच्या रक्षणासाठी ही कारवाई महत्त्वाची असल्याचं म्हटलं आहे. या कारवाईत नक्षलवादी संघटनेच्या दोन कमांडरसह सोळा जणांच्या दलाचा पोलिसांनी खातमा केला होता.

***********

काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष श्री राहुल गांधी आज पक्षाच्या देशव्यापी ‘संविधान बचाओ’ अभियानाची सुरुवात करत आहेत. भाजप सरकारच्या काळात देशाच्या संविधानावर आणि दलितांवर होत असलेल्या कथित हल्ल्यांच्या निषेधार्थ काँग्रेय हे अभियान हाती घेत असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. पुढील वर्षाच्या 14 एप्रिलपर्यंत हे अभियान सुरु राहणार असून, याकडं 2019 च्या लोकसभा निवडणुकीसाठी लोकांपर्यंत पोचण्यासाठीचे काँग्रेस पक्षाचे प्रयत्न अशा दृष्टीनं पाहिलं जात असल्याचं पीटीआयच्या याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

***********

योग पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना यापुढं भौतिकोपचार शास्त्र अर्थात फीजिओथेरपीच्या पदवी अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेताना प्राधान्य मिळणार असल्याचं विद्यापीठ अनुदान आयोगानं म्हटलं आहे. भौतिकोपचार अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आणि आवश्यक त्या सर्व पात्रता पूर्ण करणाऱ्या परंतु योगशास्त्रात प्राविण्य असलेल्या विद्यार्थ्यांनाच प्राधान्य दिल्या जाईल, असं या प्रवेशासाठी नियुक्त करण्यात आलेल्या तज्ञांच्या समितीनं केलेल्या शिफारशींना मनुष्यबळ विकास मंत्रालयानं मंजुरी दिली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगानं यापूर्वीच देशभरातील विद्यापीठांना भौतिकोपचार विषयाच्या पदवी तसंच पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये योग शास्त्राचा समावेश करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

***********

राज्यातील विविध 25 जिल्ह्यांमधील 654 ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक आणि 33 जिल्ह्यांतील सुमारे दोन हजार 812 ग्रामपंचायतींमधील चार हजार 771 रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठी 27 मे 2018 रोजी मतदान होणार असल्याची घोषणा राज्य निवडणूक आयोगानं केली आहे.

आयोगाच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, यात सदस्यपदांबरोबरच सरपंचपदाच्या थेट निवडणुकांचाही समावेश आहे. ग्रामपंचायतींच्या या निवडणुकांसाठी 7 ते 12 मे 2018 या कालावधीत नामनिर्देशनपत्रं स्वीकारले जातील. त्यांची छाननी 14 मे 2018 रोजी होईल. नामनिर्देशनपत्रं 16 मे 2018 पर्यंत मागं घेता येतील आणि त्याच दिवशी चिन्ह वाटप होईल. मतदान 27 मे 2018 रोजी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच या वेळेत होईल. गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामपंचायतींसाठी मात्र सकाळी साडेसात पासून दुपारी केवळ तीन पर्यंतच मतदानाची वेळ असेल. मतमोजणी 28 मे 2018 रोजी होईल.

***********

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना यापुढं दररोज आरोग्य आणि शारीरिक शिक्षणाच्या वर्गांना उपस्थित राहणं अनिवार्य करण्यात आलं आहे. दहावी आणि बारावीच्या परीक्षेला पात्र ठरण्यासाठी या विषयांचा अभ्यास अनिवार्य असून, या दोन्ही विषयासाठी श्रेणी पद्धतीनं गुण दिले जातील. शालेय विद्यार्थ्यांमधील वाढत्या स्थुलतेला आळा घालण्यासाठी हा निर्णय घेतला आहे. यासाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धती आणि क्रीडाप्रकार यांची माहिती देणारी 150 पानांची पुस्तिका मंडळानं तयार केली आहे. हे शिक्षण विद्यार्थ्यांना शाळेतच दिले जाणार असून, त्याचं मूल्यमापन शिक्षकच करणार आहेत. 2018-19 या शैक्षणिक वर्षात या विषयासाठी एक तासिका राखून ठेवण्याच्या सूचना मंडळानं सर्व शाळांना दिल्या आहेत.
दहावी आणि बारावीच्या परिक्षेला बसण्यासाठी या विषयाची पात्रता अनिवार्य असली तरी हे गुण विद्यार्थ्यांच्या अंतिम गुणपत्रिकेत समाविष्ट नसतील असं मंडळानं स्पष्ट केलं आहे.

***********

राज्यातील विकास मंडळांनी अधिक सक्षमपणं काम करण्याची गरज असून, या मंडळांना आवश्यक ते मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावं. यासाठी नियोजन विभागानं कालबद्ध कार्यक्रम हाती घ्यावा, असं आवाहन राज्यपाल श्री चेन्नामनेनी विद्यासागर राव यांनी आज मुंबई इथ केलं.

राज्यातील विदर्भ विकास मंडळ, मराठवाडा विकास मंडळ, उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ यांची संयुक्त बैठक राजभवन इथं मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली. त्यावेळी राज्यपाल बोलत होते.

राज्यपाल यावेळी म्हणाले, विकास मंडळांनी कार्यक्षमता वाढवून कालबद्ध पद्धतीनं या तीनही विभागांचा विकास अधिक होण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.

***********

ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर उद्योगांना बळ देण्यासाठी केंद्र सरकारला विविध उपाययोजना सूचवल्या असून, त्यांच्या अंमलबजावणीवर सरकार विचार करेल, अशी अपेक्षा आहे, असं माजी कृषीमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष श्री शरद पवार यांनी म्हटलं आहे. कोल्हापूर इथं आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

साखरेच निर्यातशुल्क, वाहतूक खर्च सरकारनं द्यावा, तसंच साखरेवर आधारित मिठाई उत्पादकांवर उपकर लावावा, अशा सूचनांचा त्यात समावेश असल्याचं त्यांनी सांगितलं.

***********

झाडांचं संवर्धन आणि संरक्षण करणं हे मानवाचं आद्य कर्तव्य आहे, त्यादृष्टीनं समाजात जनजागृती होणं गरजेचं आहे, असं प्रतिपादन सामाजिक आणि वनीकरण विभागाचे उपसंचालक श्री मोहन ढेरे यांनी केलं.
टिळक पत्रकार भवन ट्रस्टच्या नागपूर स्कूल ऑफ जर्नलिझमच्या वतीनं सुरू असलेल्या वृत्तसंकलन या अभ्यासक्रमात अतिथी अध्यापक म्हणून ते बोलत होते.

***********

विदर्भात अकोला, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, वाशिम, यवतमाळ या जिल्ह्यांत काही ठिकाणी आज आणि उद्या तापमानात वाढ अपेक्षित असून, तापमान 40 अंश सेल्सिअसच्या पार जाणार असून, दक्षतेचा इशारा देण्यात आला आहे.

***********

पाणी फाऊंडेशनतर्फे आयोजित सत्यमेव जयते वॉटर कप स्पर्धेत धुळे आणि शिंदखेडा तालुक्यातील शंभराहून अधिक गावांनी सहभाग नोंदवला आहे. ग्रामीण भागात चाललेल्या दुष्काळमुक्तीच्या प्रयत्नांना शहरातील नागरिकांची साथ मिळावी, त्यांनाही योगदान देण्याची संधी मिळावी, यासाठी पाणी फाऊंडेशननं 'जलमित्र' मोहिम छेडली आहे. या मोहिमेंतर्गत नोंदणी सुरू असून, आतापर्यंत राज्यभरात एक लाख जलमित्रांनी सहभाग नोंदवला आहे. हे सर्व जलमित्र एक मे रोजी राज्यव्यापी महा श्रमदानात सहभागी होणार असल्याची माहिती पाणी फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री सत्यजित भटकळ यांनी पत्रपरिषदेत दिली.

***********

राज्यातल्या शेतकऱ्यांना या खरीप हंगामासाठी बीटी बियाण्याचाच वापर करावा लागेल, असं कृषीमंत्री श्री पांडुरंग फुंडकर यांनी म्हटलं आहे. गुलाबी बोंड अळीचं व्यवस्थापन या विषयावरच्या एका बैठकीत ते काल बोलत होते. राज्यातल्या कृषी विद्यापीठांना आणि संशोधन संस्थांना नॉन बीटी बियाणं विकसित करण्याचे निर्देश दिले असल्याचं सांगून, ते बियाणं उपलब्ध होईपर्यंत शेतकऱ्यांनी बीटी बियाण्याचीच योग्य ती दक्षता घेत उपयोग करावा, असं श्री फुंडकर यांनी यावेळी सांगितलं.

***********

The End